P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad, Maharashtra - 41



प्रेसनोट **दिनांक – २३/११/२०२६**

दि. २२/११/२०२६ रोजी राञौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यंत दाखल गुन्हे

०१.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	वाकड ८४४/२०२६, बी एन एस ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३), ३(५) प्रमाणे
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि. २२/११/२०२६ रोजी सकाळी ११.१५ वा. चे दरम्यान डांगे चौक, थेरगांव, पुणे येथे
गुन्हा दाखल	:-	दि. २२/११/२०२६ रोजी १८/२७ वाजता
फिर्यादी	:-	माणिक बंडु राठोड, वय- ५६ वर्षे, धंदा- गवंडी, रा. विलास आप्पा पवार यांच्या भाडयाने रुमवर विटभट्टी मोरया कॉलनी ताथवडे, ता. मुळशी जि. पुणे मुळ रा. पाटोदा, ता. शेणगांव, जि. हिंगोला
आरोपी	:-	१.मोहम्मद साजीद चाँद शेख, वय- ३२ वर्षे रा. पासनरे कॉलनी, रहमान मस्जिद, थेरगांव पुणे मुळ रा. ९/७/१४० गुलशन कॉलोनी, देगलूर नाका, इतवारा नांदेड इब्राहिम युसुफ सय्यद वय- ३१ वर्षे रा. पासनरे कॉलनी, रहमान मस्जिद, थेरगांव पुणे मुळ रा. २४७५ बरकत नगर, ता. परभणी जि. परभणी
तपशिल	:-	नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे डांगे चौक येथे काम मिळेल म्हणून थांबले असता एक अनोळखी इसम फळाचे लाकडी बॉक्स घेवुन व बॉक्स मधील कचरा गवत तेथेच टाकुन निघुन गेला सदर लाकडी बॉक्स घेवुन गेलेला इसम हा फिर्यादी सोबतचाच आहे. असे समजुन फळ गाडयावाल्यांनी फिर्यादीस ते कचरा गवत उचलण्यास सांगितले. ते उचलण्यास फिर्यादीने नकार दिला म्हणून नमूद आरोपीत यांनी फिर्यादीस शिवीगाळी करुन चापटा बुक्यांनी मारहाण करुन आरोपी क्र- १ यांने फिर्यादीचे पिशवीतील गवंडी कामाचा लाकडी रंदा घेवुन फिर्यादीचे डोक्यात मारुन दुखापत केली म्हणून
त.अधिकारी/अंमलदार	:-	पोउपनि सोनुने ९९२३२६८९४७

०२.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	वाकड ८४५/२०२६, बी एन एस- ७४, ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३), ३(५)
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि. २२/११/२०२६ रोजी दुपारी ०३.१५ वा. चे दरम्यान ऑस्टीन कॉन्टीस सोसायटी, फ्लॅट नं- सी ७०४, चे समोर सी विंग मध्ये ताथवडे, ता. मुळशी जि. पुणे
गुन्हा दाखल	:-	दि. २२/११/२०२६ रोजी २१/४७ वाजता
फिर्यादी	:-	महिला फिर्यादी
आरोपी	:-	प्रदिप ढेंगळे वय अंदाजे ३५ वर्षे रा. ऑस्टीन कॉन्टीस सोसायटी, फ्लॅट नं- सी ११०१ ताथवडे, ता. मुळशी जि. पुणे व अन्य तिन साथीदार
तपशिल	:-	नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे रुम मधुन कचरा टाकण्यासाठी बाहेर विंग मध्ये गेले असता बाहेरुन फिर्यादी यांचे पती सुमीत यांचा जोरात आवाज आल्याने फिर्यादी बाहेर गेली असता प्रदिप ढेंगळे व त्याचे सोबत तिने आरोपीत रोजीचा झालेला वादाचा राग मनात धरुन फिर्यादी यांचे पतीला शिवीगाळी करुन चापटाने लाथबुक्याने व काठीने मारहाण करीत होते म्हणून सदर वेळी फिर्यादी हया त्यांच्या पतीला सोडवण्यासाठी गेल्या असता आरोपीत यांने फिर्यादी यांचे अंगातील कुर्तीला धरुन खाली पाडले त्यामुळे फिर्यादी यांचे स्त्री मनास लज्जा वाटली आणि त्यांच्या केसाला धरुन डोक्यात बुक्या मारल्या व त्याचे सोबतच्या इसमांनी लाथबुक्याने खाली पाडुन मारहाण केली. तसेच मातीने भरलेली प्लॅस्टीकची कुंडी हातात घेवुन फिर्यादी यांचे पतीचे डोक्यात मारुन मुक्का मार दिला म्हणून
त.अधिकारी/अंमलदार	:-	पोउपनि सिरसाट ९७६३४४८७१५

०३.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	संत तुकारामनगर ६१०/२०२६ भा.न्या.संहिता.२०२३ चेकलम ११८(२),११५(२),३५२,३५१(२)(३) प्रमाणे
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दिनांक २१/११/२०२६ रोजी रात्री २३/३० वा. चे सुमारास पुरबजी यांचे किराणा दुकाना जवळ, गांधीनगर, पिंपरी पुणे येथे
गुन्हा दाखल	:-	दि.२२/११/२०२६ रोजी ०७/३० वा
फिर्यादी	:-	महिला फिर्यादी
आरोपी	:-	सत्यम काळूराम शिंदे वय २८ वर्षे रा.सुमेद बौध्द विहार जवळ, गांधीनगर पिंपरी पुणे
तपशिल	:-	नमूद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे पती त्यांची मोटर सायकल पार्क करित असताना तेथे बसलेला तोंड ओळखीचा इसम आरोपीत याने फिर्यादीचे पतीला तू सकाळी माझ्याकडे काय बघत होता. असे म्हणून शिवीगाळ करून हाताने लाथाबुक्याने, सिमेंटचा गटटू डोक्यात मारून त्याचे हातामध्ये असलेल्या धारदार कटरने फिर्यादीचे पतीच्या तोंडामध्ये वार करून हिरड्याला, ओठाला व तोंडात दोन्ही बाजूस गंभीर जखमी केले व तू पोलीसात तक्रार केली तर तूझा मर्डरच करीन अशी धमकी दिली म्हणून
त.अधिकारी/अंमलदार	:-	पोउपनि आव्हाड ९४०३४६३३१६

०४.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	काळेवाडी ७३३ /२०२६, भा.न्याय.संहिता ११८(१), ३५२, ३५१(२) प्रमाणे
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि. २१/११/२०२६ रोजी रात्रौ १०/०० वा. चे सुमा. न्यु रहाटणी-काळेवाडी लिंक रोड, नाणेकर चौक, काळेवाडी, पुणे. येथील कचरा कुंडी जवळ
गुन्हा दाखल	:-	दि. २२/११/२०२६ रोजी ११/४०वा.
फिर्यादी	:-	प्रविण भारत मस्के, वय २४ वर्षे,काम - मजुरी, रा.सुदर्शन चौक, सिंहगड कॉलनी, पिंपळे गुरव, सांगवी, पुणे
आरोपी	:-	मयुरेश दौलत कोकणे, वय अंदाजे २५ वर्षे, रा. गोडांबे चोक, कौतीक हॉटेल जवळ, रहाटणी, पुणे
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी फिर्यादी दि. २१/११/२०२६ रोजी रात्रौ १०/०० वा. चे सुमा. न्यु रहाटणी-काळेवाडी लिंक रोड, नाणेकर चौक, काळेवाडी, पुणे. येथील पान टपरीवर सिगारेट घेवुन फिर्यादी जवळच असलेल्या कचरा कुंडीजवळ सिगारेट ओढत असताना त्यांचे परीचयाचा आरोपी हा फॉर्चुनर गाडी नं. एम.एच.१४ ७२७५ या गाडीने फिर्यादी जवळच येवुन हातात लोखंडी रॉड घेवुन गाडीतुन खाली उतरला व म्हणाला "तु माझ्या विरुध्द सी.पी. ऑफिसला, कोर्टात तसेच चर्तु:श्रुंगी पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज करतो काय"? असे बोलुन फिर्यादी यांना शिवीगाळ करुन हातातील लोखंडी रॉडने फिर्यादीला मारहाण करुन फिर्यादीच्या कपाळाला दुखापत केली तसेच याच्यापुढे जर पुन्हा माझ्या नावाने अर्ज केलास तर तुला दाखवतो अशी धमकी दिली म्हणुन
त.अधिकारी/अंमलदार	:-	पोउपनि मुजावर ९३५९९२७२९२

०५.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	रावेत ५६४ /२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३३१ (४) ३०५ प्रमाणे
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दिनांक २१-११-२०२६ रोजी रात्रौ १०.३० ते दि-२२-११-२०२६ रोजी सकाळी ०६.०० वा.चे दरम्यान रेड लेबल पान शॉप एच.पी.पेट्रोल पंपासमोर पांढरेवस्ती पुनावळे पुणे येथे.
गुन्हा दाखल	:-	दि. २२/११/२०२६ वेळ २२.३८
फिर्यादी	:-	रमेश कुमार वर्मा वय-३४ वर्ष धंदा-मजुरी रा- रेड लेबल पान शॉप मागे पांढरे वस्ती पुनावळे ता.हवेली जि.पुणे मुळ गाव-आसलपुर ता.कन्हई जि.प्रतापगड राज्य-उत्तर प्रदेश
आरोपी	:-	सुरेश गोरख जाधव वय. ३६ वर्षे धंदा-मजुरी रा. राम मंदिराचे पाठीमागे राम नगर चिंचवड
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी त्यांची रेड लेबल पान शॉप टपरी हि कुलुप लावून बंद करुन घरी गेले असता दरम्यानचे काळात कोणीतरी अज्ञात इसमाने कशाचे तरी सहाय्याने पान शॉप टपरीचा कडी कोयंडा उचकटुन टपरीमधील एकुण ५५७०/- रुपये किंमतीचे माल घर फोडी चोरु करुन नेले आहे म्हणुन
त.अधिकारी/अंमलदार	:-	पोहवा/ १७०४.मराठे ९३७०४७४३७५

०६.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	उत्तर महाळुंगे २४७/२०२६, भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम ३१६(४)
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि.२१/११/२०२६ रोजी रात्री ११:३० वा. चे सुमारास सुजान कॉन्टीनेटल एव्हीएस प्रा. लि. युनिट ३ कंपनी वासुली ता. खेड
गुन्हा दाखल	:-	दि -२२/११/२०२६ रोजी १४.२० वा.
फिर्यादी	:-	तुषार संपत शिरसाठ, वय-३६ वर्ष व्यवसाय- नोकरी, रा. फ्लॅट नं. बीबी ४ विघ्नहार रेसिडेन्सी मेदनकर वाडी चाकण ता.खेड जि.पुणे,
आरोपी	:-	अमन हिरालाल पटेल वय २५ वर्षे रा. बालाजी सदन शिंदेगांव रोड वासुली फाटा ता. खेड जि. पूणे. मुळ रा. पोस्ट सोनौरा, ठाणा विश्वविद्यालय, ता. हुजुर जि. रिवा मध्य प्रदेश
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी आरोपी याने जीएसएल नावाचा अल्युमिनिएमचे पार्ट त्याची एकुण किमत १२,४८० बॅगमधुन कंपनिचे पार्ट चोरी करुन बॅगमधुन घेवून गेला आहे. असे सांगीतल्याने फिर्यादी व सेक्यूरिटी ग कमलसिंग, अमन दिप सिंग व सेक्युरिटी सुपरवायझर कुलदिप सिंग यांना पाठवुन आरोपी याचे राहते घरी चौक केली असता वरील वर्णनाचा माल मिळाला असल्याने आरोपी याने फिर्यादीच्या संमती शिवाय, लबाडीच्या इरादया स्वतः चे आर्थिक फायदयाकरीता चोरून नेले आहेत. म्हणुन
त.अधिकारी/अंमलदार	:-	सपोफौ आढारी ९८५०४०४७६४

०७.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	उत्तर चाकण १०७२/२०२६ भा.न्या.सं.का.क. २८१,१०६(१),१२५(a),१२५(ड),३२४(४) मो.वा.का क १८४ प्रमाणे
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि २१/११/२०२६ रोजी राजौ ०९/४५ वाचे मौजे बहुळ गावचे हददीत शिक्रापुर चाकण रोड बहुळ फाटा नेहरुचौक ता खेड जि पुणे येथे
गुन्हा दाखल	:-	दि २२/११/२०२६ रोजी ०९:३३ वा
फिर्यादी	:-	अरुन भगवान खंदारे वय-४० वर्षे, धंदा - ख.नोकरी, रा.बर्गेवस्ती चिबळी ता.खेड जि पुणे
आरोपी	:-	दिपककुमार सरोज रा.भनईपुर पो.नरहपुर ता. कोहदौर जि.प्रतापगड राज्य उत्तरप्रदेश
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी फिर्यादी यांच्या मामाचा मुलगा सुकमनु पंजाब कांबळे वय २३ वर्षे मु पो कनेरगाव नाका ता.जि.हिगोली यमाहा FZ मोटार सायकल नं. MH २२ AR ४५९७ याचे वरुन बहुळ ते चाकण असे येत असतांना शिक्रापुर चाकण रोड बहुळ फाटा नेहरु चौक ता खेड जि पुणे या ठिकाणी त्याचे पाठीमागुन येणारा कंन्टेनर नं.MH ०३ CV ४०६१ हि आरोपी याने त्याचे ताब्यातील कन्टेनर जोरात चालवुन मोटार सायकलला कन्टेनरची डाव्या बाजुला धडक देवुन तो मोटारसायकलसह खाली पडल्याने कन्टेरचे मधील चाक त्याचे अंगावरुन जावुन त्याचे पोटास कबरेस डोक्यास हातापायास गंभीर मार लागुन त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन मोटारसायकलचे नुकसान केले आहे. म्हणुन
त.अधिकारी/अंमलदार	:-	पोहवा आटोळे ९०११२३११९७

०८.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	भोसरी २२/२०२६ भारतीय न्याय संहीता कलम २८१, १२५ (अ),१२५ (ब) मोटार वाहन कायदा कलम १८४, ११९/१७७
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दिनांक २२/११/२०२६ रोजी सकाळी ०८:०० वा.चे सुमारास पुणे नाशिक हायवे, गुडविल चौक, भोसरी, पुणे येथे
गुन्हा दाखल	:-	दि.२२/११/२०२६ रोजी २२/१७ वा
फिर्यादी	:-	महिला फिर्यादी
आरोपी	:-	सुमित गजानन घोडाम, वय २५ वर्षे, सध्या रा.बेलदार यांचे भाडेच्या खोलीत, मोरेमळा, रामनगर, मखमलाबादनगर, पंचवटी, नाशिक मुळपत्ता मु.पो दत्तापुर, ता.घाटंजी, जि.यवतमाळ
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी फिर्यादी चे पती कृष्णा लक्ष्मण भालसत्रे, वय ३० वर्षे व मुलगी ज्ञानेश्वरी कृष्णा भालसत्रे, वय ०८ वर्षे असे आळंदी येथे दर्शना करीता हिरो कंपनीची पॅशन मोटार सायकल क्रमांक MH २२ AJ ५०९१ ही वरुन जात असताना. सिग्नल लागल्यामुळे आम्ही गुडविल चौक येथे थांबले असताना. पिकअप क्रमांक MH १५ HH १८१६ या वरील चालक याने त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीच्या नियमांकडे दुलर्क्ष करुन भरधाव वेगाने निष्काळजीपणाने चालवून आमच्या मोटार सायकला पाठी मागून धडक देऊन अपघात करुन अपघातात फिर्यादीचे तसेच पती व मुलगी यांचे गंभीर दुखापतीस कारणीभूत झाला आहे. म्हणून
त.अधिकारी/अंमलदार	:-	पोउपनि कस्तुरे ८२९१७१५४५८

०९.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	निगडी १०४०/२०२६ एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम ८(क), २७, २९ प्रमाणे
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि.२२/११/२०२६ रोजी १८.०० वाजताचे सुमारास स्पाईन रोडच्या सर्व्हिस रोडचे कडेला अंकुश चौकाजवळ ओटास्किम निगडी पुणे येथे आडोशाला
गुन्हा दाखल	:-	दि.२२/११/२०२६ रोजी २२/३० वा.
फिर्यादी	:-	दत्तात्रय बबन शिंदे, पोलीस हवालदार ९७१ नेमणुक, निगडी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय,
आरोपी	:-	शुभम शिवशरण कांबळे वय २६ वर्षे, राह.गुरुदत्त हौसिंग सोसायटी, बिल्डींग नंबर एफ-३, रुम नंबर ३०७, चिकन चौक, ओटा स्किम निगडी पुणे, मुळ राह. हासापुर, ता.अक्कलकोट, जि.सोलापुर
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी आरोपी याने आपले ताबे कब्जात गांजा ओढण्याचे साहित्य असा एकुण १०५/- रु.किं.चा माल अनाधिकाराने, बेकायदेशिर रित्या जवळ बाळगुन स्टॅश प्रो पेपरमध्ये गांजा भरुन तोंडात धरुन त्यातुन येणारा धुर ओढत असताना व सेवन करताना मिळुन वरीलप्रमाणे गुन्हा दाखल आहे.
त.अधिकारी/अंमलदार	:-	मपोहवा १६८४ वाल्हेकर ७०५७९३४५८५

१०.

पोस्टे व गु रजि.नं.	:-	दक्षिण महाळुंगे ९४३/२०२६ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ चे कलम १२(अ)
गु.घ.ता.वेळ व ठि.	:-	दि. २२/११/२०२६ रोजी १८.४५ वाजण्याचे सुमारास मौजे महाळुंगे गावचे हद्दीत महीन्द्रा गेट नं. २ चे आडोशास मोकळे जागेत ता. खेड जि.पुणे येथे .
गुन्हा दाखल	:-	दिनांक -२२ /११/२०२६ रोजी २२.४१ वा
फिर्यादी	:-	आकाश दिलीप घाडगे पो.शि.ब.नं. ३३४७, नेमणुक दक्षिण महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड आयुक्तालय
आरोपी	:-	१) आदीत्य तानाजी कोहीनकर वय २१ वर्ष, रा. रासे ता. खेड जि.पुणे, मुळगाव कोहीनकरवाडी ता. खेड जि.पुणे (जुगार चालविणारा) २) गोविंदकुमार धमेंद्रकुमार यादव वय ३२ वर्षे, सध्या रा. महाळुंगे, ए जे हॉटेल पाठीमागे ता. खेड जि.पुणे मुळगाव भगवानपुर, ता. चोलापुर थाना चौबेपुर जि. उत्तर प्रदेश (जुगार खेळणारा)
तपशिल	:-	नमुद ता वेळी व ठिकाणी आरोपी मौजे महाळुंगे गावचे हद्दीत महीन्द्रा गेट नं. २ चे आडोशास मोकळे जागेत ता. खेड जि.पुणे येथे आरोपी यांनी बेकायदा बिगर परवाना स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी काळा पिवळा ५ स्टार कार्ड नावाचा जुगार खेळताना व चालवित जुगाराचे साहीत्य व रोख रक्कम असा एकुण ७३००/- रु. चे मुददेमालासह मिळुन आले म्हणुन
त.अधिकारी/अंमलदार	:-	पोहवा पारधी ८५३०६३७२७२